# पोलीस उप–आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

OW/DCP TRAFFIC THN/ADM/ NOTIFICTION / 60 /2018
पोलीस उप आयुक्त,शहर वाहतूक शाखा,यांचे कार्यालय,तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दिनांक :–10092018
दुरध्वनी क्रमांक 022- 25401056

**–:वाहतूक नियंत्रण अधिसुचना:–**

ठाणे शहरातील कासारवडवली वाहतूक उपविभागाच्या हद्दीत गणेश मुर्तीचे विसर्जनाचे म्हणजे दि.१४/०९/२०१८, दि. १७/०९/२०१८ ,दि.१९/०९/२०१८ ,व दि. २३/०९/२०१८ –( अनंत चतुर्दशी ) रोजी विसर्जनाचे मार्गावरील वाहतूक सुनिश्चित रहावी या करीता आमजनेतच्या सोईसाठी,

महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दिनांक २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून मी अमित का.काळे, पोलीस उप आयुक्त, वाहतुक विभाग ,ठाणे शहर पुढील प्रमाणे वाहतुक नियंत्रण अधिसुचना जारी करीत आहे:–

१) घोडबंदर रोडने ठाणे बाजूकडे येणाऱ्या जड–अवजड वाहनांना **गायमुख जकात नाका** येथे **प्रवेश बंद** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग** :– सदरची जड–अवजड वाहने ही चिंचोटी नाका –भिवंडी अंजुरफाटा–अंजुर चौक –मानकोली मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदरची अधिसुचना दि.१४/०९/२०१८, दि.१७/०९/२०१८ ,दि.१९/०९/२०१८ ,व दि. २३/०९/२०१८ रोजी दुपारी १४.०० वा. पासून गणेश मुर्तीचे विसर्जन संपेपर्यंत अंमलात राहिल. सदरची अधिसुचना पोलीस, फायरब्रिगेड, रूग्णवाहीका, गणेश मुर्ती विसर्जनातील वाहने व इतर अत्यावश्यक वाहनांना लागु रहाणार नाही.

( अमित का.काळे )
पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग
ठाणे शहर

प्रति,

जिल्हा प्रसिध्दी अधिकारी,ठाणे
२/– सदरची अधिसुचनेस प्रसिध्दी देणेस विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर**
मा.आयुक्त, ठाणे महानगरपालिका,ठाणे./मा.जिल्हाधिकारी, ठाणे/मा.पोलीस अधीक्षक,ठाणे ग्रामीण.

प्रत कार्यवाहीसाठी :–
प्रादेशिक परिवहन अधिकारी ,ठाणे
विभाग नियंत्रक,महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे/भिवंडी/कल्याण/पनवेल.
परिवहन व्यवस्थापक–परिवहन विभाग,ठाणे महानगरपालिका,ठाणे /बृहन्मुंबई (बीईएसटी)
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१,ठाणे,परिमंडळ–५ वागळे इस्टेट व विशेष शाखा,ठाणे व वाहतुक नवी मुंबई,

प्रत:– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे,ठाणे शहर
२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष,ठाणे
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– सपोआ वाहतूक विभाग, ठाणे /सर्व संबंधीत प्रभारी अधिकारी वाहतूक उपविभाग.
२/– म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सुचना फलक लावून घ्यावीत.